G3/C

वंगण तेले व ग्रीस यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यावरील नियंत्रणासाठी "सक्षम अधिकारी" विकास आयुक्त (उद्योग) यांचे अधिकारांचे प्रत्यायोजन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शुध्दिपत्रक क्रमांक-एमएससी-२००४/५२५५२/(८१६१)/उद्योग-१८

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दि.:- २ नोव्हेंबर, २००४

**वाचा:-** १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-एमएससी-१०८७/३२२३४/(५२९३)/उद्योग-१८, दिनांक १४ जून १९८८.

२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-एमएससी-१०९६/४३६२१/(६८४१)/उद्योग-१८, दिनांक १ मे, १९९६.

३) उद्योग संचालनालयाचे क्रं.रसायन/वंगण तेले-ग्रीस धोरण/९९/अे-१२३८३, दिनांक १८.५.१९९९ चे पत्र.

४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-एमएससी-१०९९/३६९६८/(७१६१)/उद्योग-१८, दिनांक १० जून १९९९.

५) शासन शुध्दिपत्रक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-एमएससी-२००२/७२५०९/(७८६५)/उद्योग-१८, दिनांक ५ सप्टेंबर २००२.

६) शासन शुध्दीपत्रक क्र. उ.ऊ.व. का. वि क्र. एमएससी- २००४/५२५५२/(८१६१)/उ.१८ दि.२६/३/२००४

७) उद्योग संचालनालयाचे क्र.रसायन/वंगण तेल-ग्रीस धोरण/९९/अे-४६४०, दिनांक १५.३.२००४ चे पत्र.

**प्रस्तावना :-** माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जनतेशी थेट संपर्क साधून जलद व सुलभ रितीने एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जिल्हा केंद्र, ठाणे येथे प्रायोगिक तत्वावर उद्योग सेतू स्थापन करण्याची संकल्पना अमलात आलेली आहे. त्यामुळे कालापव्यय टाळून किमान कालावधीत उद्योजकांना मार्गदर्शन एकाच ठिकाणी मिळेल. या उद्दिष्टांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे, यांना पवंगणतेले ग्रीस यांचे विक्रेत्यांचे अनुज्ञप्ती प्राप्त करण्याचे अधिकार प्रधन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यानुसार उद्योग विभागाचे उपरोल्लेखित शासन निर्णय व शुध्दीपत्रके रद्बादल ठरवून शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.-

**शासन निर्णय :-** पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या आदेशानुसार वंगण, तेल यांच्या उत्पादनाचा पुरवठा व वितरण यावरील नियंत्रणासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांची सक्षम अधिकारी म्हणून नेमणूक केली असली तरी त्यांच्या अधिकाराचे प्रत्यायोजन पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र राज्यातील वंगण, तेल व ग्रीस त्यांचे उत्पादन व वंगण, तेलावर प्रक्रिया करणाऱ्या घटकांचे अनुज्ञप्तीसाठी सक्षम अधिकारी म्हणून काम पहाणारे अधिकारी. | विकास आयुक्त (उद्योग) व त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे काम पाहतील. |
| २) | मुंबई प्राधिकरण विभागातील ठाणे व रायगड जिल्ह्याचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी वंगण, तेल व ग्रीस यांच्या विक्रेत्याची अनुज्ञप्ती अदा करण्यासाठी | उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण, मुंबई हे काम पहातील. |
| ३) | वरीलप्रमाणे अनुक्रमांक २ येथील क्षेत्र वगळता महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये वंगण, तेल व ग्रीस यांचे विक्रेत्याची अनुज्ञप्ती अदा करण्यासाठी सक्षम अधिकारी | संबंधित जिल्ह्याचे महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, हे काम पहातील. |

वरील अधिकाऱ्यांना विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अधिकारांचे प्रत्यायोजन करण्यात आलेले असले तरी विकास आयुक्त (उद्योग) यांचे अधिकार कोणत्याही प्रकारे अबाधित राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स.पा.ठाकरे)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

विकास आयुक्त(उद्योग) उद्योग संचालनालय, मुंबई. (५ प्रती)
उद्योग सह संचालक(रसायन) उद्योग संचालनालय,नविन प्रशासन भवन,मुंबई.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे.
विशेष कार्य अधिकारी (रसायन) उद्योग संचालनालय,नविन प्रशासन भवन,मुंबई.
सचिव,अन्न व नागरी पुरवठा विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
चिफ टक्नीकल सर्विसेस,मॅनेजर इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड,
वेस्ट रिजन क्लार्क रोड, मुंबई- ४०० ०३४.
स्टेट को-ऑर्डिनेटर आईल इंडस्ट्रिज महाराष्ट्र
व्दारा डिव्हीजनल मॅनेजर भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड,
मेकर्स टॉवर्स, १२ वा मजला, ड विंग कफ परेड, मुंबई ४०० ००५.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १, मुंबई
निवड नस्ती (उद्योग ४८)